सकाळ
कोल्हापूर, शनिवार, १३ एप्रिल २०२४

# जल्लोषात रंगला विवेकानंद महोत्सव

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १२** : विवेकानंद महोत्सवात अभिवाचन, एकपात्री, शॉर्ट फिल्म मेकिंग, आदी स्पर्धा घेण्यात आल्या. उद्‌घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. सध्याचा काळ कौशल्य विकासाचा असून, अशा काळात विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी स्पर्धेमध्ये सहभागी होणे महत्त्वाचे असल्याचे डॉ. कुंभार यांनी सांगितले.




कोल्हापूर : मिस्टर विवेकानंद किताब ऋषिकेश शिंदे, तर मिस विवेकानंदचा किताब प्रणाली सूर्यवंशी हिने पटकावला. त्यांच्यासमवेत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व अन्य मान्यवर.

दरम्यान, फूड फेस्टिव्हलमध्ये वेगवेगळ्या पदार्थांचा खवय्यांनी मनसोक्त आस्वाद घेतला. मिस्टर अँड मिस विवेकानंद स्पर्धा जल्लोषात झाली.

स्पर्धांचे समन्वयक म्हणून डॉ. प्रदीप पाटील, प्रा. एच. व्ही. चामे, ए. एस. महात, पल्लवी देसाई, सनी काळे यांनी जबाबदारी सांभाळली. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी आभार मानले.

## विविध स्पर्धेंतील विजेते असे

विदिरा विभुते व साक्षी कुलकर्णी, प्रतिज्ञा पालकर, ऋषी डोंगरे व सुयश झुणके (अभिवाचन स्पर्धा), प्रज्ञा कुलकर्णी, साक्षी चोथे, प्रांजल जाधव (एकपात्री), अनुज पुनवतकर, पायल लांडगे, चेतन हेगाडे (शॉर्ट फिल्म मेकिंग), मुस्कान जमादार व शिवम काटकर, नाझिया देसाई व इंद्रायणी भांदिगरे, दीपक गावडे व रसिका गायकवाड (नावीन्यपूर्ण संशोधन). मिस्टर विवेकानंद किताब : ऋषिकेश शिंदे (बी.एस्सी. भाग-१), तर मिस विवेकानंद किताब : प्रणाली सूर्यवंशी (बी.ए. भाग-२).